पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८९ /२०१६
दिनांक : १२/०२/२०१६

प्रति,

मा......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.


विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक **१६/०२/२०१६** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **१६/०२/२०१६** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ११**

दिनांक : **१६/०२/२०१६** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **१६/०२/२०१६** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

---------

दिनांक ०२/०२/२०१६ व ०४/०२/२०१६ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १०)** सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नवनगर विकास विभाग अधिसुचना क्र.पीएस-१८९३/१४१२/युडी-१३, दिनांक २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजूर विकास आराखडयात तथापि महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग अधिसुचना क्र.पीसीएन-१६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, मंत्रालय, मुंबई, दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये मंजूर विकास आराखडयात मौजे भोसरी येथील स.नं.१५ पै. व स.नं.१४ पै. मधील २४.० मी. रुंद रस्ता व १२.० मी. रस्ता प्रस्तावित आहे. मौजे भोसरी येथील नागरिकांची दळणवळणाची गैरसोय होत असल्याने व वाहतुकीच्यादृष्टीने स.नं.१५ पै. व १४ पै.मिळकतीमधील मंजूर विकास योजनेतील २४.० मी. (स.नं.१५ पै.) व १२.० मी. (स.नं.१४ पै.) रुंद रस्ता विकसित करणे आवश्यक आहे. रस्त्याने बाधित क्षेत्र हे खाजगी मिळकतधारकाचे असल्याने भूसंपादन करणे आवश्यक असल्याने " पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी.हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व १४ पै. मधील २४ व १२ मी. रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे क्षेत्र भूसंपादन अधिनियमान्वये संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरीता व सदर भूसंपादनास येणा-या खर्चास मान्यता देणेस व खर्च रक्कम अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक १६/०२/२०१६ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

विषय क्र.२) मौजे पिंपळे गुरव भागाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, यांचेकडील अधिसुचना क्र.TPS/1893/1276/CR-1974/93/UD-13 दि. १८ सप्टेंबर १९९५ अन्वये शासनाकडून मंजूर करणेत आली आहे. सदर विकास योजनेनुसार मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.७९ पैकी व ८० पैकी जागेत आरक्षण क्र.३५६, " प्राथमिक शाळा विस्तार " प्रस्तावित केलेले आहे. सदरचे आरक्षण डी.पी.रिपोर्टनुसार सुमारे १५००.०० चौ.मी. क्षेत्रावर आहे. प्रत्यक्षात मंजूर विकास आराखडयात दर्शविलेनुसार

सदरचे क्षेत्र सुमारे २५००.०० चौ.मी. क्षेत्रावर असून त्यापैकी ५००.०० चौ.मी. क्षेत्रावर शाळा विकसित आहे. सदर आरक्षणचे जागेपैकी सुमारे ९००.०० चौ.मी. क्षेत्र टि.डी.आर.च्या बदल्यात महानगरपालिकेच्या ताब्यात सद्यस्थितीत आलेले आहे. ताब्यात नसलेल्या क्षेत्रावर अनधिकृत बांधकामे आहेत. आरक्षणाचे उर्वरित क्षेत्र टि.डी.आर. किंवा खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करणेच्या बदल्यात महानगरपालिकेच्या ताब्यात मिळणेकरीता प्रयत्न करणेत आलेले आहे. सदर आरक्षण विकसित करणे आवश्यक असल्याबाबत स्थानिक प्रतिनिधी या विभागाकडे मागणी करीत आहे. त्यामुळे उर्वरित क्षेत्र भूसंपादनाने संपादीत करता येवु शकते. त्यामुळे सदर आरक्षण पूर्णपणे विकसित करता येईल. केंद्र शासनाने **“ The Right to fair compensation and Transparency in land acquisition, Rehabilitation Resettlement Act 2013 ”** हा नवीन भूसंपादन कायदा तयार केला असून दि. १ जानेवारी २०१४ पासून सदर कायदा अंमलात आला आहे. तरी उपरोक्त प्रस्तावित आरक्षणाखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व नवीन भूसंपादन कायदा अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक १६/०२/२०१६ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८९/२०१६
दिनांक : १२/०२/२०१६ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.